स.का.पाटील सिंधुदुर्ग
महाविद्यालय व रा.प.कनिष्ठ
महाविद्यालय, मालवण



# बोले छोटे, पर्यावरण कसे?

लहान मुलांचे पर्यावरण
विषयक विचार ऐकायला अवश्य या.

अथर्व बार्डवेकर

गायत्री झांटये

मृणालिनी देसाई

दिंनाक: 30 जानेवारी 2020
वेळ :: सकाळी 10.30

स्थळ:-स.का.पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय (झांटये सभागृह)

# प्रवाळ जतन, संवर्धन काळाची गरज

## बोले छोटे, पर्यावरण कसे? कार्यक्रमात गायत्री झांटयेचे सादरीकरण




**मालवण : येथील स.का.पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालयात गायत्री झांटये हिने प्रवाळ संवर्धन व जतन या विषयावर आपले मनोगत मांडले.**

मालवण : समुद्री प्रवाळ हा केवळ सागरी पर्यावरणाच्या दृष्टीनेच नव्हे तर समग्र सृष्टीच्या दृष्टीने अमूल्य असा ठेवा आहे. मत्स्योत्पादन आणि पर्यटन विश्वातील आर्थिक उलाढालीचा एक महत्त्वाचा दुवा म्हणून प्रवाळांकडे पाहिले जाते. प्रवाळ टिकले तर मासेमारी व पर्यटन टिकेल याचा विचार करून प्रवाळ संवर्धन व जतनासाठी आपण सर्वांनी पुढाकार घ्यायला हवा, असे विचार गायत्री झांटये हिने मांडले.

स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय आणि रा. प. कनिष्ठ महाविद्यालय यांच्या वतीने 'बोले छोटे पर्यावरण कसे?' या विषयावर शालेय विद्यार्थ्यांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मालवणातील गायत्री झांटये हिने 'प्रवाळ संवर्धन' ह्या विषयावर सादरीकरण करत प्रवाळांचे पर्यावरणातील महत्त्व विषद केले. माशांसाठी प्रवाळ खूप महत्त्वाचे आहेत. मालवणचा पर्यटन व्यवसाय वृद्धींगत होण्यास पाण्याखालची प्रवाळ कारणीभूत ठरली. परंतु ह्या अनमोल प्रवाळांना आपण हानी पोहचवून आपण कुठेतरी स्वतःचेच नुकसान करीत नाही ना? याकडेही लक्ष देण्याची गरज असल्याचे मत झांटये हिने मांडले.

तिच्या सादरीकरणाचे मान्यवरांनी कौतुक केले. यावेळी प्राचार्य डॉ. श्रीरंग मंडले, बाळासाहेब पंतवालावलकर, डॉ. शशिकांत झांटये, डॉ. मालविका झांटये, डॉ. राहूल पंतवालावलकर, प्रा. हसन खान, प्रा. के. एन. काटकर, युरेका सायन्स क्लबच्या सुषमा केणी आदी उपस्थित होते. मृणालिनी देसाई हिने 'पाणथळ जमीन' तर श्रेया रावराणे हिने 'देवराई' या विषयावर विचार मांडले. अथर्व बार्डवेकर या विद्यार्थ्यानेही सादरीकरण केले.

# स. का. पाटील महाविद्यालयात पर्यावरणविषयक विचार

मालवण

अत्यंत गतीशीलतेने भारताची पर्यावरणीय स्थिती ढासळत आहे. सोबत पृथ्वीचीही. वातावरणदृष्ट्या हाताबाहेर स्थिती निर्माण केली आपण. आता जर काही करता येत असेल, तर ते म्हणजे, परिणामांची परिणामकारकता कमी करण्याचा प्रयत्न. शाश्वत जीवनाच्या पायरीतील भविष्याचा वेध हा काळ्या विकासात विसरला गेला आहे म्हणून भावी पिढी बोलते आहे, विचारते आहे, आमचा विचार नाही आला का तुमच्या मनात? शुद्धतेचे वारस होतो आम्ही, तुम्ही ओरबडून खाल्ले. या पार्श्वभूमीवर स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालयाच्या नेचर क्लबमार्फत बोले छोटे, पर्यावरण कसे? कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला मृणालिनी देसाई, अथर्व बोर्डवेकर, गायत्री झांटये व श्रेया रावराणे या १२ ते १५ वर्षांच्या मुलांनी परखडपणे पर्यावरण संवर्धनविषयक विचार मांडले.

कृ. सी. देसाई शिक्षण मंडळाचे कार्याध्यक्ष बाळासाहेब पंतवालावलकर, डॉ. झांटये, राहुल पंतवालावलकर, मालविका झांटये, महेंद्र पराडकर, युरेका क्लबच्या सुषमा केणी, प्रा. हसन खान, प्रा. एच. एम. चौगले, प्रा. आर. एन. काटकर, प्रा. डी. व्ही. हारगिले, मिलन सामंत, कनिष्ठ महाविद्यालय व सायन्स कॉलेजचा स्टाफ, पर्यावरणप्रेमी व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

१९९८- ९९ या वर्षाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ मंगळवार

तसेच अध्यक्ष म्हणून संस्थेचे कार्याध्यक्ष श्रीपाद पंतवालावलकर हे उपस्थित

आवाहन महाविद्यालयाकडून करण्यात आले आहे.

# भविष्यातील पिढीसाठी पर्यावरणाचे संवर्धन महत्वाचे

# छोट्या मुलांनी व्यक्त केली भविष्यातील पर्यवरणाविषयी काळजी

मालवण,१ फेब्रु.(प्रतिनिधी)- जगात पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे अनेक समस्या निर्माण होत असून त्याचा परिणाम मानवी जीवनावर होत आहे. त्यामुळे शाश्वत जीवनासाठी मानवानेच आता पासून खबरदारी घेतली पाहिजे. पर्यावरणाचे संवर्धन करणे व समतोल साधणे भविष्यातील पिढीसाठी महत्वाचे आहे, असे विचार सिंधुदुर्ग महाविद्यालयात आयोजित बोले छोटे, पर्यावरण कसे? या कार्यक्रमात बोलताना छोट्या मुलांनी व्यक्त केले.

अत्यंत गतीशीलतेने पृथ्वीची पर्यावरणीय स्थिती ढासळत आहे. भारतातही पर्यावरण संबंधी अनेक समस्या समोर येत आहेत. परिस्थिती हाताबाहेर जाण्याअगोदर उपाययोजना करणे महत्वाचे असून पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे होणाऱ्या परिणामांची परिणामकता कमी करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. याहेतूने आजच्या आणि भविष्यातील पर्यावरणाबाबत आजच्या मुलांचे विचार काय आहेत हे जाणण्यासाठी मालवण येथील स.का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालयाच्या नेचर क्लब मार्फत बोले छोटे, पर्यावरण कसे? या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मृणालिनी देसाई, अथर्व बोर्डवेकर, गायत्री झांटये व श्रेया रावराणे या १२ ते १५ वर्षाच्या मुलांनी अत्यंत परखडपणे पर्यावरण संवर्धन विषयक विचार मांडले. यावेळी कु.सि.देसाई शिक्षण मंडळाचे कार्याध्यक्ष बाळासाहेब पंतवालावलकर, डॉ. झांटये, डॉ. राहुल पंतवालावलकर, डॉ. मालविका झांटये, महेंद्र पराडकर, युरेका क्लबच्या सुषमा केणी, प्रा. हसन खान, प्रा. एन. एम.चौगले, प्रा. आर. एन.काटकर, प्रा. डी. व्ही. हरगिले, प्रा. मिलन सामंत यांसह कनिष्ठ महाविद्यालय व सायन्स कॉलेज शिक्षक व कर्मचारी वर्ग, पर्यावरण प्रेमी व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

कु. मृणालिनी देसाई हिने दंतकथा व त्याद्वारे पूर्वी पर्यावरणाचे रक्षण कसे जात होते याचे स्पष्टीकरण केले. पूर्वीच्या लोकांना पर्यावरण संवर्धन करण्यासाठी कायद्यांची भीती बाळगावी लागत नव्हती, कारण ते गावाची संपत्ती आपली समजून जोपासत व दंत कथांची त्यांना भीती होती. जिल्ह्यातील प्रत्येक गावाला इतिहास आहे व तो इतिहास मी शोधून शाळेतील मुलांना सांगणार असे मत मृणालिनी हिने व्यक्त केले. कु. अथर्व बोर्डवेकर याने, पाणथळ भूमी व त्याचे महत्व व संवर्धन याविषयी प्रेक्षकांशी संवाद साधून सादरीकरण केले. पाणथळ जागांचा ७५ मीटरचा बफर झोन असतो त्यात कोणत्याही प्रकारचे बांधकाम करू नये पण अशा अनेक अतिक्रमणाच्या घटना वाढत आहेत.

कु. गायत्री झांटये हिने प्रवाळ संवर्धनाच्या सादरीकरणाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. १ टक्के पेक्षा कमी सागरी परिसंस्थेत प्रवाळ आहेत. परंतु त्यांचे महत्व अगणिक आहे. जर हेच नसतील तर मत्स्यव्यवसाय, पर्यटन समूळ नष्ट होईल. त्यामुळे यांची काळजी कशी घ्यावी? हे आपल्या अस्खलित भाषेत स्पष्ट केले. कु. श्रेया रावराणे हिने देवराया व त्याचे संवर्धन यावर आपले सादरीकरण केले. वनसंपत्तेचे रक्षण करण्यासाठी देवराया ही सुंदर कल्पना आहे.

प्रत्येक गावात देवराया असायच्या, पण दिवसागणिक त्यांची संख्या कमी होते आहे. अनेक पक्षी, प्राणी, वनस्पती, फुलपाखरे यांच्या प्रजातींचे ते घर आहे, असे मत आपल्या सादरीकरणातून व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आंब्याच्या झाडाचे रोपण करण्यात आले. शेवटी चारही मुलांनी पर्यावरण संरक्षण शपथ घेऊन पर्यावरण संरक्षणाच्या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. श्रीरंग मंडले यांनी तर सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा. हसन खान यांनी केले.



सिंधुदुर्ग महाविद्यालय येथे आयोजित बोले छोटे पर्यावरण कसे ? या कार्यक्रमाच्या निमित्ताने वृक्षारोपण करताना लहान मुले.

## ... हस्ते स्पर्धांचे बक्षिस वितरण

... शिक्षिका, विद्यार्थी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्पर्धेचे विजेते हायस्कूलचे विद्यार्थी पुढीलप्रमाणे आहेत. (वक्तृत्व स्पर्धा) सलोनी पार्टे नाधवडे हायस्कूल, पूजा झोरे वैभववाडी,मानिका तांबे लोरे,दिक्षा मोरे नेर्ले, पल्लवी गुरव कोकिसरे. (निबंध स्पर्धा) मैथिली रावराणे वैभववाडी, कामिनी राऊत कोकिसरे, सानिका तांबे लोरे,यश सुर्वे नेर्ले, सलोनी पार्टे नाधवडे. (चित्रकला) प्रिती पांचाळ नाधवडे,प्रथमेश सुतार लोरे,वेदांत पवार वैभववाडी. कामेश्वरी खाडेकर नाधवडे, धनंजय गुरव कोकिसरे, खुशी सुतार लोरे.




VERSACE

*KRISHNARAO SITARAM DESAI SHIKSHAN MANDAL"S*
**S.K.PATIL SINDHUDURG MAHAVIDYALAYA AND**
**RAMBHAU PARULEKAR JUNIOR COLLEGE,**
**MALVAN, DIST. SINDHUDURG (MAHARASHTRA STATE)-416 606**
**(Regd.No.Bombay Public Trust F-10/(Sindhudurg)**
**(Affiliated to Mumbai University)**

**PRINCIPAL:** DR.S.B.MANDALE
M.A., ,Ph.D.

**Ph.No.Off.& Fax.No.** (02365) 252079
**Res.** (02365) 252586
**Mob.No.** 9960146143
**E-mail** – dcmalvan@gmail.com

---

**Outward No.** 222/2019-20 **DATE: 29/01/2020**

**प्रती**
**मा.बंदर अधिकारी,**
**मालवण,**
**सिंधुदुर्ग**

**विषय :** दिनांक २ फेब्रुवारी २०२० रोजी जागतिक पाणथळ दिवसाच्या औचीत्याने मालवण सागरी महामार्ग स्वच्छतेबाबत.

**मा.महोदय,**

उपरोक्त विषयानुसार , आमच्या महाविद्यालयातील नेचर क्लब मार्फत दिनांक २ फेब्रुवारी २०२० रोजी सकाळी ७.३० वाजता जागतिक पाणथळ दिवसाच्या औचीत्याने देऊळवाडा मालवण सागरी महामार्गाकडून स्वच्छता करण्यात येणार आहे.पाणथळ भूमी व कांदळवने भूमिगत पाण्याची पातळी वाढवण्याच्या व जैवविविधतेच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्त्वाच्या आहेत.या विचारातून हे स्वच्छता कार्य महाविद्यालयाने हाती घेतले आहे.या कार्यास आपल्या कार्यालयाकडून आवश्यक मदत पत्राखाली नमुद करण्यात आली आहे.तरी आपण या कार्यक्रमास सहभागी होऊन कार्याकार्माची शोभा वाढवावी ही विनंती.

**Principal**
**S. K. Patil Sindhudurg Mahavidyalaya**
**MALVAN, (Dist. Sindhudurg)**

**मदतीची आवश्यकता :**

1. स्वच्छता साहित्य ( हातमोजे,गमबुट व इतर साहित्य इ.)

*KRISHNARAO SITARAM DESAI SHIKSHAN MANDAL"S*
**S.K.PATIL SINDHUDURG MAHAVIDYALAYA AND**
**RAMBHAU PARULEKAR JUNIOR COLLEGE,**
**MALVAN, DIST. SINDHUDURG (MAHARASHTRA STATE)-416 606**
**(Regd.No.Bombay Public Trust F-10/(Sindhudurg)**
**(Affiliated to Mumbai University)**

**PRINCIPAL:** DR.S.B.MANDALE
M.A., ,Ph.D.

**Ph.No.Off.& Fax.No.** (02365) 252079
**Res.** (02365) 252586
**Mob.No.** 9960146143
**E-mail –** dcmalvan@gmail.com

**Outward No.** 219 **/2019-20** **DATE: 29/01/2020**

**प्रती**
**मा. नगराध्यक्ष**
**नगरपरिषद,मालवण,**
**सिंधुदुर्ग.**

**विषय** : प्लास्टिक मुक्त शहर दृष्टीकोनातून महाविद्यालायाच्या वतीने मोफत कापडी पिशव्यांचा वाटप कार्यक्रम आपल्या हस्ते करण्याबाबत.

**मा.महोदय,**

उपरोक्त विषयानुसार, आमच्या महाविद्यालयातील नेचर क्लब मार्फत **सोमवार,दिनांक ०३ फेब्रुवारी २०२० रोजी सकाळी १०:३०** वाजता आठवडा बाजाराचे औचीत्य साधून मोफत कापडी पिशव्या वाटप करण्यात येणार आहे. घरातील जुन्या कपड्यांचा वापर, स्वतः शिलाई करून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कापडी पिशव्या तयार केल्या आहेत. आपल्याकडून कौतूकाची थाप मिळावी या उद्देशाने आपल्या हस्ते कार्याकार्माचे उद्घाटन व्हावे असा मानस आहे. तरी आपण आपल्या व्यस्त वेळेतून वेळ काढून उपस्थित राहावे ही विनंती

कळावे .

Principal
प्राचार्य
S. K. Patil Sindhudurg Mahavidyalaya.
MALVAN, (Dist. Sindhudurg)

*KRISHNARAO SITARAM DESAI SHIKSHAN MANDAL"S*
S.K.PATIL SINDHUDURG MAHAVIDYALAYA AND
RAMBHAU PARULEKAR JUNIOR COLLEGE,
MALVAN, DIST. SINDHUDURG (MAHARASHTRA STATE)-416 606
(Regd.No.Bombay Public Trust F-10/(Sindhudurg)
(Affiliated to Mumbai University)

**PRINCIPAL:** DR.S.B.MANDALE
M.A., ,Ph.D.

**Ph.No.Off.& Fax.No.** (02365) 252079
**Res.** (02365) 252586
**Mob.No.** 9960146143
**E-mail** – dcmalvan@gmail.com

**Outward No.** 200 **/2019-20**

**DATE: 29/01/2020**

**प्रती**
**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी [CEO]**
**नगरपरिषद ,मालवण**

**विषय :** दिनांक २ फेब्रुवारी २०२० रोजी जागतिक पाणथळ दिवसाच्या औचीत्याने मालवण सागरी महामार्ग स्वच्छतेबाबत.

**मा.महोदय,**

उपरोक्त विषयानुसार , आमच्या महाविद्यालयातील नेचर क्लब मार्फत दिनांक २ फेब्रुवारी २०२० रोजी सकाळी ७.३० वाजता जागतिक पाणथळ दिवसाच्या औचीत्याने देऊळवाडा मालवण सागरी महामार्गाकडून स्वच्छता करण्यात येणार आहे. पाणथळ भूमी व कांदळवने भूमिगत पाण्याची पातळी वाढवण्याच्या व जैवविविधतेच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्त्वाच्या आहेत.या विचारातून हे स्वच्छता कार्य महाविद्यालयाने हाती घेतले आहे.तरी आपण या कार्यक्रमास सहभागी होऊन कार्याकार्माची शोभा वाढवावी ही विनंती.

Principal
प्राचार्य
S. K. Patil Sindhudurg Mahavidyalaya
MALVAN, (Dist. Sindhudurg)

प्रती :- मा. नगराध्यक्ष,नगरपरिषद,मालवण

29/1/2020
मालवण नगरपरिषद

# नेचर क्लबतर्फे सागरी महामार्गावर स्वच्छता मोहीम

## सिंधुदुर्ग महाविद्यालयाचे दोनशे विद्यार्थी, पर्यावरणप्रेमींचा सहभाग : पालिकेच्या पाच घंटागाड्या भरून कचरा गोळा

**वार्ताहर**
**मालवण**

जागतिक पाणथळ भूमी दिनानिमित्त येथील स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय व रामभाऊ परुळेकर कनिष्ठ महाविद्यालयाच्या नेचर क्लबतर्फे शहरातील सागरी महामार्गावर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. मोहिमेत प्रा. हसन खान यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे २०० विद्यार्थी व पर्यावरणप्रेमी नागरिकांनी सागरी महामार्गाच्या दुतर्फा पाणथळ जागांवर ठिकठिकाणी साचलेला कचरा गोळा केला. यात नगरपालिकेच्या पाच घंटागाड्या भरून कचरा तसेच मोठ्या प्रमाणावर दारूच्या बाटल्या गोळा केल्या.

मालवण देऊळवाडा सागरी महामार्ग येथून रविवारी सकाळी ७.३० वाजता या स्वच्छता मोहिमेस प्रारंभ झाला. स्वच्छतेबाबत मालवणी घोषवाक्य असलेले फलक लावण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीरंग मंडले, प्रा. आर. एन. काटकर, प्रा. हसन खान, प्रा. एम. आर. खोत, चंद्रवदन कुडाळकर, रविकिरण तोरसकर, लक्ष्मीकांत खोबरेकर, स्वाती पारकर, अमेय देसाई, डॉ. झाटये, भूषण मेतर, मालवणचे वन अधिकारी अश्विनी लोखंडे, स्पेन येथून आलेले पर्यटक पावलो विदाल, महाविद्यालयाचे विद्यार्थी-विद्यार्थिनी, युरेका क्लबची मुले, मालवणमधील पर्यावरणप्रेमी नागरिक आदी बहुसंख्येने या मोहिमेत सहभागी झाले होते.



**मालवण : नेचर क्लबतर्फे सागरी महामार्गावर राबविलेल्या स्वच्छता मोहिमेत सहभागी विद्यार्थी.**

रविवारी सकाळी सुरू झालेली ही स्वच्छता मोहीम दुपारी एकपर्यंत राबविण्यात आली. तब्बल पाच घंटागाड्या भरून कचरा व एक टाटा एस गाडी भरून दारूच्या बाटल्या गोळा करण्यात आल्या. गोळा केलेल्या प्लास्टिक बाटल्या व काचेच्या बाटल्या स्थानिक भंगारवाल्यांना देण्यात आल्या. मोहिमेसाठी वन विभागातर्फे टोप्या, मास्क व ग्लोव्हज पुरविण्यात आले. कचरा विल्हेवाटीसाठी नगरपरिषदेचे सहकार्य लाभले. कार्यक्रम नियोजनासाठी नेचर क्लबप्रमुख प्रा. हसन खान तसेच यशवंत राणे, प्रीतम कांबळी, वासुदेव गोसावी, मयुरेश मेस्त्री, पंकज कवटकर, शुभम डोंगरे, रत्नप्रभा आढाव, वैभवी गावकर, वेलसीय लुद्रीक, क्षितीजा खराडे, प्रतीक्षा गवाणकर आदींनी मेहनत घेतली.

### स्वच्छता मोहिमेतील निरीक्षणे

स्वच्छता मोहीम राबविताना विविध निरीक्षणे नोंदविण्यात आली. यात स्वच्छता मोहिमेवेळी सागरी महामार्गाच्या संपूर्ण परिसरात कुठेच कचरा कुंड्या नव्हत्या. परिसरातील कांदळवनांची तोड केलेली आहे. कांदळवन प्रदेशात कचऱ्याचे साम्राज्य दिसून आले. मोठ्या प्रमाणावर दारूच्या बाटल्या व बांधकाम साहित्य याठिकाणी टाकण्यात आले. अनेक ठिकाणी कचऱ्याचा भराव टाकून पाणथळी बुजविणे सुरू आहे. अनेक पक्षी व वनस्पतींचा अधिवास जो पर्यटनाचे केंद्र होऊ शकते ते कचरा केंद्र करून ठेवण्यात आले आहे, अशी निरीक्षणे नोंदविल्याची माहिती प्रा. खान यांनी दिली.

तरुण भारत Sat, 08 February 2020
epaper.tarunbharat.com/c/48800514

...धारेवर धरले त्याप्रसंगी टिपलेले **छायाचित्र.** आदिंसह मानकरी,

# नेचर क्लबच्या सागरी महामार्ग स्वच्छता मोहिमेस उत्स्फूर्त प्रतिसाद

मालवण, ३ फेब्रु. (प्रतिनिधी) :- ...तिक पाणथळ भूमी दिनाच्या निमित्ताने का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय व ...भाऊ परूळेकर कनिष्ठ महाविद्यालय, ...च्या नेचर क्लब मार्फत मालवण ...तील सागरी महामार्गावर स्वच्छता मोहीम ...विण्यात आली. या मोहिमेत प्रा. हसन खान ...या मार्गदर्शनाखाली सुमारे दोनशे ...र्थ्यांनी व पर्यावरण प्रेमी नागरिकांनी ...री महामार्गाच्या दुतर्फा पाणथळ जागांवर ...ठिकाणी साचलेला कचरा गोळा केला. ...ध्ये नगरपालिकेच्या पाच घंटा गाड्या ...न कचरा तसेच मोठ्या प्रमाणावर दारूच्या ...ल्या गोळा करण्यात आल्या.

मालवण देऊळवाडा सागरी महामार्ग ...र रविवारी सकाळी साडे सात वाजता या ...च्छता मोहिमेस प्रारंभ झाला. यावेळी ...च्छते बाबत मालवणी घोषवाक्य असलेले ...क लावण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.श्रीरंग मंडले, प्रा. आर.एन.काटकर, प्रा. हसन खान, प्रा. एम.आर.खोत, चंद्रवदन कुडाळकर, रविकिरण तोरसकर, लक्ष्मीकांत खोबरेकर, स्वाती पारकर, डॉ.झांटये, मालवण वन अधिकारी, स्पेन येथून आलेले पर्यटक पाबलो विदाल, महाविद्यालयाचे विद्यार्थी-विद्यार्थिनी, युरेका क्लबची मुले, मालवणमधील पर्यावरण प्रेमी नागरिक आदी बहुसंख्येने या स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले होते.

सकाळी सुरू झालेली ही स्वच्छता मोहीम दुपारी एक वाजेपर्यंत राबविण्यात आली. यावेळी सागरी महामार्गाच्या लगत मोठ्या प्रमाणावर कचरा असल्याचे दिसून आले. यात प्लास्टिक व दारूच्या बाटल्यांचे प्रमाण मोठे होते. तब्बल पाच घंटा गाड्या भरून कचरा व एक टाटा ऐस गाडी भरून दारूच्या बाटल्या गोळा करण्यात आल्या. गोळा केलेल्या प्लास्टिक बाटल्या व काचेच्या बाटल्या स्थानिक भंगारवाल्यास देण्यात आल्या. या मोहिमेसाठी वन विभागातर्फे टोप्या, मास्क व ग्लोव्हज पुरविण्यात आले होते. तर कचरा विल्हेवाट लावण्यासाठी नगरपरिषदेचे सहकार्य लाभले. महाविद्यालयातील राज मालोडकर याने छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष करून व महाराजांच्या विचारांचा फलक लावून या स्वच्छता मोहिमेची सांगता झाली.

दरम्यान, या स्वच्छता मोहिमेवेळी सागरी महामार्गच्या संपूर्ण परिसरात कुठेच कचरा कुंड्या नव्हत्या, येथील कांदळवनांची तोड केलेली आहे, कांदळवन प्रदेशात कचऱ्याचे साम्राज्य दिसून आले, तसेच मोठ्या प्रमाणावर दारूच्या बाटल्या व बांधकाम साहित्य याठिकाणी टाकले असल्याचे निर्दशनास आल्याचे प्रा. हसन खान यांनी सांगत नाराजी व्यक्त केली.



**मालवण: सागरी महामार्ग येथे स्वच्छता मोहीम राबविताना सिंधुदुर्ग महाविद्यालयाच्या नेचर क्लबचे ...द्यार्थी, प्राध्यापक, व पर्यावरण प्रेमी नागरिक. (छाया- भूषण मेतर)**

# विद्या...

मडुरा (वार्ता...) शैक्षणिक संस्थांन... भूमिका राज्य... शैक्षणिक गुणव... महत्वाची आहे. ... सुसंस्कृत होतो. ... आर्थिक सक्षम ... व्यावसायिक ... लागेल, असे ... पाटबंधारे विभाग... संदेश पारकर यांनी...

विद्या विहार... कनिष्ठ महावि... वार्षिक पारितोषिक... श्री. पारकर बो...





स.का.पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय व रामभाऊ परुळेकर कनिष्ठ महाविद्यालय, मालवण

# World Wetland Day

# जागतिक पाणथळ दिवस

**2nd February**

जागतिक पाणथळ दिवस औचित्याने महाविद्यालयाच्या नेचर क्लब मार्फत मालवण सागरी महामार्ग स्वच्छता कार्य व मुलांनी स्वत: जुन्या कापडाद्वारे निर्मित कापडी पिशव्या यांचे मोफत वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.तरी आपण सर्वांनी या उपक्रमात सहभागी होऊन पर्यावरणाचे ऋण फेडण्याचा प्रयत्न करूया.

## कार्यक्रम स्वरूप

2 फेब्रुवारी : सकाळी 7:30 वाजता मालवण सागरी महामार्ग स्वछता .( देऊळवाडा प्रवेशाकडून सुरुवात)

3 फेब्रुवारी : मा.महेशजी कांदळगावकर(नगराध्यक्ष, मालवण नगरपालिका) यांच्या हस्ते मोफत कापडी पिशव्या वाटप.
ठिकाण: सुबोध मेडिकल जवळ, मालवण.
वेळ : सकाळी 10:30 वाजता.


ABP
माझा
सिंधुदुर्ग
20-20
सागरी महामार्गावर स्वच्छता मोहीम
बीड
जिल्ह्यात आजपासून सैन्यभरती,१३

लोकमत

# विद्यार्थ्यांनी जुन्या कापडापासून बनविल्या पिशव्या

## सिंधुदुर्ग महाविद्यालयाच्या नेचर क्लबचा उपक्रम : नागरिकांना कापडी पिशव्यांचे केले वाटप

लोकमत न्यूज नेटवर्क

मालवण : मालवण येथील स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय व रामभाऊ परुळेकर कनिष्ठ महाविद्यालयाच्या नेचर क्लबमार्फत जागतिक पाणथळ दिनाचे औचित्य साधून कापडी पिशव्या वाटपाचा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. यात विद्यार्थ्यांनी जुन्या कापडाचा वापर करून स्व:कौशल्याने तयार केलेल्या कापडी पिशव्यांचे मोफत वाटप मालवण बाजारात नागरिकांना करून प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळण्याचे आवाहन केले. या उपक्रमाचे मालवणचे नगराध्यक्ष महेश कांदळगावकर यांच्यासह मालवणवासीयांनी कौतुक केले.

या कापडी पिशवी वाटपाचा शुभारंभ मालवणचे नगराध्यक्ष महेश कांदळगावकर यांच्या हस्ते करण्यात आला.




मालवण येथील सिंधुदुर्ग महाविद्यालयाच्या नेचर क्लबतर्फे विद्यार्थ्यांनी बनविलेल्या कापडी पिशव्यांचे वाटप नागरिकांना करण्यात आले.

मालवण सोमवार पेठ येथे सुबोध मेडिकलसमोर आयोजित कार्यक्रमात या कापडी पिशव्यांचे मोफत वाटप करण्यात आले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीरंग मंडले, नगरसेवक मंदार केणी, नगरसेविका तृप्ती मयेकर, डॉ. आर. एन. काटकर, हसन खान, वन अधिकारी अश्विनी लोखंडे, आनंद हुले, मुकेश बावकर, सिद्धेश आचरेकर, अमेय देसाई, अजय आळवे, दुर्गेश गावकर, महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी केलेल्या कार्याचे व महाविद्यालयाच्या नेचर क्लबद्वारे होत असलेल्या कार्याचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. या उपक्रमास नगरपालिकेकडून सर्वतोपरी सहकार्य करू, अशी हमी नगराध्यक्ष कांदळगावकर यांनी दिली.

आनंद हुले यांनी मुंबईला असणारी कापडी पिशव्यांची मागणी महाविद्यालयाने पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत, जेणेकरून त्यातून मुलांना अर्थार्जनाचा मार्ग मिळेल व त्यासाठी आपण सहकार्य करू असे सांगितले. उपक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाच्या नेचर क्लबचे प्रमुख हसन खान, यशवंत राणे, प्रीतम कांबळी, वासुदेव गोसावी, मयुरेश मेस्त्री, पंकज कवटकर, शुभम डोंगरे, रत्नप्रभा आढाव, वैभवी गावकर, वेलसीय लुद्रीक, क्षितिजा खराडे, प्रतीक्षा गवाणकर आदी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली.

लाभ घेतला.

खोत यांनी ही मोहीम राबविली.



सिंधुदुर्ग महाविद्यालयाच्या नेचर क्लबतर्फे विद्यार्थ्यांनी बनविलेल्या कापडी पिशव्यांचे वाटप नागरिकांना करण्यात आले. यावेळी उपस्थित नगराध्यक्ष महेश कांदळगावकर, प्राचार्य डॉ. श्रीरंग मंडले, प्रा. हसन खान व इतर (छाया- भूषण मेत्री)

# जुन्या कापडापासून विद्यार्थ्यांनी बनविलेल्या पिशव्यांचे वाटप

## सिंधुदुर्ग महाविद्यालयाच्या नेचर क्लबचा अभिनव उपक्रम

मालवण, ४ फेब्रु. (प्रतिनिधी) - जागतिक पाणथळ दिनाच्या औचित्याने मालवण येथील स.का.पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय व रामभाऊ परुळेकर कनिष्ठ महाविद्यालयाच्या नेचर क्लबमार्फत स्वच्छता मोहीम व कापडी पिशव्या वाटप असे अभिनव उपक्रम राबविण्यात आले. यात विद्यार्थ्यांनी जुन्या कापडाचा वापर करून स्व:कौशल्याने तयार केलेल्या कापडी पिशव्यांचे मोफत वाटप मालवण बाजारात नागरिकांना करून प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळण्याचे आवाहन करण्यात आले. या उपक्रमाचे मालवणचे नगराध्यक्ष महेश कांदळगावकर यांच्यासह मालवणवासीयांनी कौतुक केले.

या कापडी पिशवी वाटपाचा शुभारंभ मालवणचे नगराध्यक्ष महेश कांदळगावकर यांच्या हस्ते करण्यात आला. मालवण सोमवार पेठ येथे सुबोध मेडिकल समोर आयोजित कार्यक्रमात या कापडी पिशव्यांचे मोफत वाटप करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.श्रीरंग मंडले, नगरसेवक मंदार केणी, नगरसेविका तृप्ती मयेकर, प्रा. आर.एन.काटकर, प्रा. हसन खान, मालवण वन अधिकारी अश्विनी लोखंडे, आनंद हुले, मुकेश बावकर, सिद्धेश आचरेकर, अमेय देसाई, अजय आळवे, दुर्गेश गावकर, माजी विद्यार्थी व महाविद्यालयातील विद्यार्थी- विद्यार्थिनी उपस्थित होते.

या उपक्रमास नगरपालिकेकडून सर्वतोपरी सहकार्य करू अशी हमी नगराध्यक्ष कांदळगावकर यांनी दिली. तर आनंद हुले यांनी मुंबईला असणारी कापडी पिशव्यांची मागणी महाविद्यालयाने पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत, जेणेकरून त्यातून मुलांना अर्थार्जनाचा मार्ग मिळेल. हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी नेचर क्लबचे प्रमुख प्रा. हसन खान तसेच यशवंत राणे, प्रीतम कांबळी, वासुदेव गोसावी, मयुरेश मेस्त्री, पंकज कवटकर, शुभम डोंगरे, रत्नप्रभा आडाव, वैष्णवी गावकर, वेलसीय सुद्रीक, क्षितिजा खराडे, प्रतीक्षा गवाणकर आदींनी मेहनत घेतली.

# विद्यार्थ्यांनी जुन्या कापडापासून बनविल्या पिशव्या

## सिंधुदुर्ग महाविद्यालयाच्या नेचर क्लबचा उपक्रम : नागरिकांना कापडी पिशव्यांचे केले वाटप

लोकमत न्यूज नेटवर्क

**मालवण** : मालवण येथील स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय व रामभाऊ परुळेकर कनिष्ठ महाविद्यालयाच्या नेचर क्लबमार्फत जागतिक पाणथळ दिनाचे औचित्य साधून कापडी पिशव्या वाटपाचा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. यात विद्यार्थ्यांनी जुन्या कापडाचा वापर करून स्व-कौशल्याने तयार केलेल्या कापडी पिशव्यांचे मोफत वाटप मालवण बाजारात नागरिकांना करून प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळण्याचे आवाहन केले. या उपक्रमाचे मालवणचे नगराध्यक्ष महेश कांदळगावकर यांच्यासह मालवणवासीयांनी कौतुक केले.

या कापडी पिशवी वाटपाचा शुभारंभ मालवणचे नगराध्यक्ष महेश कांदळगावकर यांच्या हस्ते करण्यात आला.




मालवण येथील सिंधुदुर्ग महाविद्यालयाच्या नेचर क्लबतर्फे विद्यार्थ्यांनी बनविलेल्या कापडी पिशव्यांचे वाटप नागरिकांना करण्यात आले.

मालवण सोमवार पेठ येथे सुबोध मेडिकलसमोर आयोजित कार्यक्रमात या कापडी पिशव्यांचे मोफत वाटप करण्यात आले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीरंग मंडले, नगरसेवक मंदार केणी, नगरसेविका तृप्ती मयेकर, डॉ. आर. एन. काटकर, हसन खान, वन अधिकारी अश्विनी लोखंडे, आनंद हुले, मुकेश बावकर, सिद्धेश आचरेकर, अमेय देसाई, अजय आळवे, दुर्गेश गावकर, महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी केलेल्या कार्याचे व महाविद्यालयाच्या नेचर क्लबद्वारे होत असलेल्या कार्याचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. या उपक्रमास नगरपालिकेकडून सर्वतोपरी सहकार्य करू, अशी हमी नगराध्यक्ष कांदळगावकर यांनी दिली.

आनंद हुले यांनी मुंबईला असणारी कापडी पिशव्यांची मागणी महाविद्यालयाने पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत, जेणेकरून त्यातून मुलांना अर्थार्जनाचा मार्ग मिळेल व त्यासाठी आपण सहकार्य करू असे सांगितले. उपक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाच्या नेचर क्लबचे प्रमुख हसन खान, यशवंत राणे, प्रीतम काबळी, वासुदेव गोसावी, मयुरेश मेस्त्री, पंकज कवटकर, शुभम डोंगरे, रत्नप्रभा आढाव, वैभवी गावकर, वेलसीय लुद्रीक, क्षितिजा खराडे, प्रतीक्षा गवाणकर आदी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली.


S.K.P.Sindhudurg
Mahavidyalaya
and
R.P.Junior Colle


S.K.P.Sindhudurg
Mahavidyalaya
R.P.Junior
MALVAN

# स्थलांतरित पक्षी कुवरला जीवदान

## भूषण माडये याची तत्परता : वन्यजीव बचाव कार्यात नेचर क्लबचा पुढाकार

**प्रतिनिधी**
**मालवण**

तालुक्यातील तारकर्ली एमटीडीसी शेजारील समुद्र किनारी कुवर हा सागरी पक्षी उडण्यास असमर्थ असल्याचे भूषण शरद माडये यांच्या निदर्शनास आले. त्याने इतरांच्या हल्ल्यापासून संरक्षण व्हावे, यासाठी आपल्या ताब्यात घेऊन घरी नेले. मालवण नेचर क्लबच्या प्रा. हसन खान यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे माडये कुटुंबाने त्याची काळजी घेतली.

ही बाब मालवण फॉरेस्ट कर्मचारी रामकृष्ण मडवळ यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. त्यानुसार मडवळ यांनी भूषणच्या घरी जाऊन पक्ष्याला ताब्यात घेतले व पशु वैद्यकीय डॉक्टरांना दाखवून प्राथमिक उपचार केले. काल कुवरला (Gull) मडवळ व त्यांचे सहकाऱ्यांनी किनाऱ्याला सोडले आणि पाहुणा उडून गेला. या पक्ष्याचे इंग्रजी नाव Slender_Billed_Gull असे आहे. मराठीत सांगायचे झाले, तर पातळ चोचीचा कुवर असे त्याला संबोधले जाते. IUCN नुसार याची संख्यात्मक दृष्टीने स्थिती Least Concern आहे. भूषण व माडये कुटुंबाने केलेल्या कार्याचे विविधस्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.



भूषण माडये



कुवर पक्षी

तरुण भारत Tue, 21 April 2020
https://epaper.tarunbharat.com/c/51169289


2020.03.24 09:45








2020.03.24 09:43



26° 93% 6:31 am



26° ··· 93% 6:29 am



26° 93% 6:29 am





कै वि अ आजगांवकर
रामभाऊ परुळेकर















7 comments








S.Y.B.Com
There is no limit to what we as women can accomplish
Women mature Sooner then men
Give us freedom not feardom
Don't teach us how to dress Teach men how to see
Stand up straight for God's Sake!
Give Women rights or well fight
Whatever a woman's reason may say her feelings tell her the truth
Be a real man and respect Women
Listen when a girls Says no means no.


A Women's whole life is a history of the affections.
No human should be without rights.
The key to Safety is in Your hands.
Safety rules are your best tools.
SELF
DEFENCE
APPS




विशाखा:-मार्गदर्शन




कॉलेज कॅम्पस स्वच्छता



कांदळगाव कॅम्प स्वच्छता



कॅम्प स्वच्छता



ग्रामपंचायत परिसर स्वच्छता



पर्यावरण रक्षण – सायकल रॅली



एक कदम स्वच्छता की ओर



प्रदूषण जागृतता सप्ताह 1 ते 11 जुलै 2019



एक कदम स्वच्छता की ओर



स्वच्छतेच्या संदर्भात शपथ NCC